**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/पुवि/कॅस पदोन्नती /२०२४ / १५५६२ दि. २४/०४/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र
महाविद्यालये, **पुण, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **आचारसंहिता कालावधीत शिक्षकांच्या पदोन्नती (CAS) प्रस्तावावरील कार्यवाहीबाबत..**

संदर्भ - १. मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/
कॅस/मवि-१/२४३९ दिनांक १९.४.२०२४.
२. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित पत्रांच्या विषानुषंगाने कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६.३.२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ चा कार्यक्रम घोषित करुन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे.

तसेच भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या आदर्श आचारसंहितेच्या काळात आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दिनांक ०२.०१.२०२४ च्या पत्राद्वारे विविध विषयावरील मार्गदर्शक सूचना निदर्शनास आणल्या आहेत. सदर सूचना मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०५.०३.२०२४ व दि. ०७.०३.२०२४ च्या पत्राद्वारे सर्व प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणण्यात आल्या आहेत.

या अनुषंगाने सार्वजनिक विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पदोन्नती प्रस्तावावर कार्यवाही करतांना उपरोक्त मार्गदर्शक सूचनांच्या आधारे नियमानुसार कार्यवाही करतांना **मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून पूर्वपरवानगी / मान्यता घेण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, यांचे परवानगी मिळाल्यानंतर या कार्यालयाकडे शिक्षक कर्मचारी पदोन्नतीचे (कॅस) प्रस्ताव सादर करावेत.**

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
Phone No. ०२०-२६१२२१११ Web : www.dhepune.gov.in Email : mavi.dhepune@nic.in

क्र. संकीर्ण-२०२४/कॅस/मवि-१/ २८३८ दिनांक १९.०४.२०२४

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य.

**विषय : आचारसंहिता कालावधीत शिक्षकांच्या पदोन्नती (CAS) प्रस्तावावरील कार्यवाहीबाबत.**

संदर्भ : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता

भारत निवडणूक आयोगाने दि. १६.०३.२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चा कार्यक्रम घोषित करुन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे.

तसेच, भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या आदर्श आचारसंहितेच्या काळात आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि. ०२.०१.२०२४ च्या पत्राद्वारे विविध विषयावरील मार्गदर्शक सूचना निदर्शनास आणल्या आहेत. सदर सूचना मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या दि. ०५.०३.२०२४ व दि. ०७.०३.२०२४ च्या पत्राद्वारे सर्व प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणण्यात आल्या आहेत.

याअनुषंगाने राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पदोन्नती प्रस्तावावर कार्यवाही करताना उपरोक्त मार्गदर्शक सूचनांच्या आधारे नियमानुसार कार्यवाही करताना मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून पूर्वपरवानगी / मान्यता घेण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी.

प्रस्तुतची बाब संबंधित सार्वजनिक विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२